ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०७ वा ❑ भारतीय सौर दिनांक १५ आश्विन शके १९४८, बुधवार दि.०७ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

आशियाई क्रीडा स्पर्धा: नव्या पर्वाची नांदी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

जपानमधील आयची-नागोया येथे १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने जिंकलेली ८५ पदके हा केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर तो एका नव्या, आत्मविश्वासी आणि प्रबळ भारताचा हुंकार आहे. क्रीडा विश्वात पदकतालिकेला अनन्यसाधारण महत्त्व असतेच, पण त्यापलीकडे जाऊन या पदकांनी जागतिक मंचावर भारताची एक नवी ओळख निर्माण केली आहे. या स्पर्धेत भारताने २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदके मिळवून पदकतालिकेत चौथे स्थान पटकावले आहे. आकडेवारीच्या पलीकडे जाऊन पाहिल्यास, या पदकांमागे भारतीय खेळाडूंचा अफाट संघर्ष, जिद्द आणि जिंकण्याची प्रखर लालसा दडली आहे. एका क्षणी पदकतालिकेत पहिल्या दहाच्या बाहेर असलेल्या भारताने स्पर्धेच्या शेवटच्या दोन दिवसांत तब्बल ११ सुवर्णपदके जिंकून थेट पहिल्या पाचात धडक मारली, हे भारतीय खेळाडूंच्या कधीही हार न मानणाऱ्या लढाऊ वृत्तीचे जिवंत आणि स्फूर्तिदायक उदाहरण आहे.

गेल्या काही दशकांचा भारतीय क्रीडा क्षेत्राचा इतिहास पाहिला, तर तो अनेकदा अपुऱ्या सुविधा, व्यवस्थेतील त्रुटी, लालफीतशाही आणि नैराश्याच्या सावटाखाली वावरताना दिसायचा. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडू केवळ सहभाग नोंदवण्यासाठी जातात, अशी एक पुसटशी धारणा बनली होती. पण आज चित्र पूर्णपणे बदलले आहे. या ८५ पदकांमध्ये त्या खेड्यापाड्यातून आलेल्या खेळाडूंचा घाम आणि रक्त सांडले आहे, ज्यांनी मातीच्या मैदानावरून थेट आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिंथेटिक धावपट्टीवर आणि मॅटवर झेप घेतली आहे. आजचा भारतीय खेळाडू मैदानात उतरतो तो केवळ खेळण्यासाठी नाही, तर जिंकण्याच्या प्रखर इर्षेने. मोडक्या सायकलवर सरावाला जाणारे, योग्य आहाराअभावी संघर्ष करणारे आणि जुन्या साधनांनी सराव करणारे अनेक खेळाडू आज आशियाई मंचावर सुवर्णपदक गळ्यात घालून उभे आहेत. ही पदके केवळ धातूचे तुकडे नसून, ती भारतीय मानसिकतेत झालेल्या सकारात्मक बदलाची, तळागाळातील गुणवत्तेची आणि परिस्थिती कितीही आव्हानात्मक असली तरी बाजी पलटवण्याच्या ताकदीची प्रतीके आहेत.

या स्पर्धेतील काही विजय तर पिढ्यान् पिढ्या लक्षात राहतील असे आहेत. भारतीय महिला हॉकी संघाने तब्बल ४४ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर मिळवलेले ऐतिहासिक सुवर्णपदक हे या जिद्दीचे सर्वात मोठे आणि प्रेरणादायी उदाहरण आहे. एका संघटित ताकदीने आणि अचूक रणनीतीने त्यांनी हा इतिहास रचला. यासोबतच ट्रॅक आणि फील्डमधील अनपेक्षित मुसंडी, नेमबाजी आणि तिरंदाजीतील भारतीयांचा अचूक वेध, तसेच क्रिकेट आणि कबड्डीच्या मैदानावर पुरुष आणि महिला संघांनी मिळवलेले निर्विवाद वर्चस्व हे अधोरेखित करते की, पूर्वी मोजक्याच खेळांवर असणारी भारताची मदार आता सर्वदूर विस्तारली आहे. आपण आता केवळ एका खेळावर अवलंबून नाही, तर बहुआयामी क्रीडाशक्ती म्हणून उदयाला येत आहोत. शेवटच्या क्षणापर्यंत न हरण्याची वृत्ती आणि पिछाडीवर असतानाही एका झटक्यात सामन्याचे पारडे फिरवण्याची क्षमता या स्पर्धेने संपूर्ण जगाला दाखवून दिली.

ही ८५ पदके केवळ वर्तमानाचा उत्सव नाही, तर ती भविष्याची नांदी आहे. जेव्हा एखादा भारतीय खेळाडू तिरंगा अंगावर ओढून आणि डोळ्यांत अभिमानाचे अश्रू आणून विजेत्यांच्या मंचावर उभा राहतो, तेव्हा तो केवळ स्वतःसाठी जिंकलेला नसतो. त्या क्षणी तो देशातील लाखो तरुणांच्या आणि खेड्यापाड्यातील मुलांच्या डोळ्यांत एक नवे स्वप्न पेरत असतो, त्यांना असा विश्वास देत असतो की, जर मी हे करू शकतो, तर तुम्हीही करू शकता. ही पदके देशाच्या क्रीडा व्यवस्थेलाही एक स्पष्ट व सडेतोड संदेश देतात की, जर या खेळाडूंना योग्य वेळी, योग्य त्या सुविधा आणि भक्कम पाठबळ मिळाले, तर सर्वोच्च जागतिक मंचावरही पदकांचा पाऊस पाडण्याची क्षमता त्यांच्यात आहे. थोडक्यात सांगायचे तर, संकटांना घाबरून माघार घेणारा नाही, तर संकटांच्या छातीवर पाय रोवून स्वतःचे अस्तित्व सिद्ध करणारा हा नवा भारत आहे. खेळाडूंच्या या अफाट जिद्दीने, संघर्षाने आणि रक्ताचे पाणी करून मिळवलेल्या या यशाने सुरू झालेले हे नवे पर्व भारताच्या क्रीडा क्षितिजावर नक्कीच प्रदीर्घ काळ आणि अधिक प्रखरतेने प्रकाशमान राहील.

दुष्काळी पार्श्वभूमीवर विद्यापीठात केंद्रीय युवक महोत्सवाला साधेपणाने प्रारंभ!

प्रख्यात सिनेअभिनेते नागराज मंजुळेच्या हस्ते उद्घाटन, माजी विद्यार्थी कैलास वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती १०७ महाविद्यालयांतील ६५० कलावंत सहभागी





ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – दुष्काळाचे चटके सहन करणाऱ्या मराठवाड्यातील युवक कलावंतांनी आपल्या कलेतून वरुणराजाला पावसासाठी हाक दिलीच सोबत आपल्यात असलेली रगही महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी दाखवून दिली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने होत असलेल्या या महोत्सवात १०७ महाविद्यालयांतील सुमारे साडेसहाशे कलावंत सहभागी झाले आहेत.

प्रख्यात अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते सोमवारी, ५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता महोत्सवाचे उद्घाटन झाले. कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. यावेळी सिने अभिनेता तथा माजी विद्यार्थी कैलास वाघमारे, प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. गौतम पाटील, डॉ. योगिता होके-पाटील, कुलसचिव डॉ. संजय कवडे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. हा महोत्सव ७ ऑक्टोबरपर्यंत विद्यापीठ परिसरात चालणार आहे.

जिल्हास्तरीय युवक महोत्सव १ ते १२ सप्टेंबर दरम्यान घेण्यात आले. या महोत्सवातील प्रत्येक कला प्रकारात विजेते तीन संघ केंद्रीय युवक महोत्सवात सहभागी झाले आहेत.

विद्यापीठ नाट्यगृहात उद्घाटन सोहळा पार पडला. प्रारंभी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी दीप प्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन केले. महोत्सव यंदाच्या दुष्काळी पार्श्वभूमीवर घेण्यात येत असल्याचे प्रास्ताविकात सांगितले. चार जिल्ह्याचे महोत्सव, केंद्रीय व जानेवारीत होणारा लोककला महोत्सव असे एकूण सहा महोत्सव घेण्यात येणार असल्याचे डॉ. अंभुरे म्हणाले. प्रख्यात निवेदक डॉ प्रेषित रुद्रवार यांनी सूत्रसंचालन तर कुलसचिव डॉ.संजय कवडे यांनी आभार मानले.

यजमान महाविद्यालयांचा गौरव

जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल चारही संयोजक महाविद्यालयांचे प्राचार्य व सांस्कृतिक समन्वयक यांचा यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये छत्रपती संभाजीनगर – शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय – प्राचार्य डॉ.वैशाली देशमुख व प्रा.परमेश्वर पुरी, जालना – लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय व स्वामी विवेकानंद महाविद्यालय – प्राचार्य डॉ. भारत खंदारे व डॉ. सुधाकर जाधव तसेच बीड – पंडित गुरू पार्डीकर महाविद्यालय प्राचार्य डॉ. अनंत जाधव व डॉ. मुंजाभाऊ धोंडगे यांचा गौरव करण्यात आला. तसेच राष्ट्रीय युवक महोत्सवात प्रावीण्य मिळविलेल्या कलावंतांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

हारलेल्या माणसांना घेऊन सिनेमा काढतो-नागराज मंजुळे

जिंकण असो की हारणे याला काही लॉजिक नसते. मी तर अनेकदा हारलेल्या माणसांना सोबत घेऊनच सिनेमा काढतो. जीवनात पुढे जायचे असेल, तर सतत ध्येयपथावरून चालत राहणे महत्वाचे असते. चालले की आपण पाहिजे त्या ठिकाणी नक्की पोहचतो, असे मत प्रख्यात मराठी सिनेदिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी केंद्रीय युवक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी मांडले. माणसाला जन्मल्यापासून प्रत्येक ठिकाणी लढाईच करावी लागते. शाळा-महाविद्यालयाच्या बाहेरही शिकता आले पाहिजे. माझ्यासारखा कसलीही पार्श्वभूमी नसलेल्या माणूस दिग्दर्शक होऊ शकतो. आपणही हा विचार करून काम करा, असे आवाहन मंजुळे यांनी युवा कलावंतांना केले.

वेदनेला चिमटीत पकडतो तोच खरा कलावंत – कैलास वाघमारे

पायात रुतलेला काटा चिमटीत घेऊन काढल्यावर वेदना कमी होते. त्याप्रमाणे वेदना चिमटीत पकडणारच खरा कलावंत असतो, असे प्रतिपादन विद्यापीठाचे माजी विद्यार्थी, अभिनेता कैलास वाघमारे यांनी केले. आयुष्यात आलेली संधी दवडता कामा नये. कारण संधी पुढून शेंडी अन् मागून होंडी असते. जसे फड्याला चरगाठ बांधल्यावर मूठ भक्कम होते, तशीच कलेलाही चरगाठ बांधणारे लोक भेटल्यामुळे यशस्वी होत गेलो, असेही वाघमारे म्हणाले.

दुष्काळ लढायला शिकवितो-कुलगुरू

अध्यक्षीय समारोपात कुलगुरू डॉ.विजय फुलारी म्हणाले, मराठवाड्यातील माणूस असे अनेक दुष्काळ पचवून मोठा झालेला आहे. अशावेळी रडायचे नसते तर लढायचे असते, असे दुष्काळ आपल्याला शिकवित असतो. त्यामुळे विद्यार्थी कलावंतांनी आपल्या प्रतिभेचा समर्थ आविष्कार दाखवावा. युवक महोत्सवात विद्यार्थिनींचा सहभाग वाढावा, यासाठी जिल्हा युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रांत संशोधनाला वाव मिळावा, यासाठी विद्यापीठाने जिल्हावार आविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले. नागराज मंजुळे, कैलास वाघमारे यांच्यासारखे आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वत: तसे घडावे, असे आवाहनही डॉ फुलारी यांनी युवा कलांवतांना केले.



अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत बालगीतांच्या मैफलीस भरभरुन प्रतिसाद

पिंपरी चिंचवड महानगरपालिकातर्फे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

पिंपळे सौदागर – गणपती उत्सवातील आठवणी, भूक लागलेल्या कावळेदादासाठी चिमणीने आणलेला पाव, दुध पिणारी मनीमाऊ, प्राण्यांना घेऊन जाणारी झुकझुक गाडी, डूलत चाललेला हत्तुल्या, कोंबडीच्या पिल्लाची शिकवणी अशा बहारदार वर्णनाच्या बालगीत मैफलीस बच्चेकंपनीने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. निमित्त होते मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने '' अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत मंगळवार दि. ६ रोजी सुप्रसिद्ध गीतकार, गायिका आणि संगीतकार भारती न्यायाधीश यांच्या बालगीतांच्या कार्यक्रमाचे.

संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली हा कार्यक्रम झाला. विजय न्यायाधीश यांच्या संकल्पनेतून सादर झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात '' या हो या, या हो या गणपती बाप्पा लवकर या '' या गीताने करण्यात आली. त्यानंतर भारती न्यायाधीश आणि त्यांचे बालकलावंत ध्वनी गुप्ता, ईरा चायनाखवा आणि शौर्यवी मांडवगडे यांनी एकापेक्षा एक सरस बालगीते सादर करुन उपस्थित रसिक विद्यार्थ्यांची मने जिंकली. '' आमच्या घरची मनीमाऊ '', '' कावळेदादा काव काव '', '' झुक झुक झुक निघाली जंगलकीन '', '' हत्तुल्या रे हत्तुल्या '', '' कोंबडीने शिकविले पिल्लाला '' या काही बालगीतांना शालेय विद्यार्थ्यांनी विशेष दाद दिली. '' डुबी डुबी डम डम '' या गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या कार्यक्रमासाठी महानगरपालिकेचे ग्रंथालय समन्वयक प्रविण चाबुकस्वार , प्रशासकीय अधिकारी दत्तात्रय सुर्यवंशी तसेच किशोर केदारी आणि साळवे यांचे सहकार्य लाभले.






जात्यावरच्या ओव्या.....

आली आली गौराई
भावजयीचा निरोप
महालक्ष्मी चे पाय
तुमच्या मागे आपोआप ||८७६||

आली आली गौराई
साडी नेसली भरजरी
कपाळी कुंकू लावून
मिरवली माझ्या घरी ||८७७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७७



ज्योतिर्मय साहित्य

ही चिंता का टाकून द्यायची ? कारण जी गोष्ट मुळात नाहीच आहे, तिच्याबद्दल चिंता करून काय उपयोग ? मोहमायेमुळे हा संसार आपल्याला खरा वाटतो. त्याची भूल आपल्याला पडते. पण खऱ्या सत्यापासून आपण लांब जातो. वाळवंटातील तहानलेल्या माणसाला मृगजळ दृष्टीस पडते. तिथे आपल्याला नक्कीच पाणी मिळेल या आशेने तो त्याच्या शोधात पुढे पुढे जात राहतो. शेवटी त्याला लक्षात येते की आपल्याला जे पाणी वाटले होते, ते तर केवळ मृगजळ ! मृगजळ म्हणजे भ्रम. पाणी नाही हे सत्य. त्याप्रमाणेच हा संसार ! खरा वाटतो पण अखेरीस त्याची व्यर्थता लक्षात येते. खरी वस्तू एकच. ती म्हणजे भगवंताचे नाम. ते नाम पवित्र करणारे आहे. सत्याची जाणीव करून देणारे आहे. संसाराची व्यर्थता लक्षात आणून देणारे आहे. म्हणून हे मना, असे पवित्र नाम तू हृदयात धारण कर आणि संसाराची व्यर्थ चिंता सोडून दे. जी गोष्ट मुळात नाहीच तिची चिंता करण्यात काय अर्थ ?



तुकाराम महाराज म्हणतात,''हेचि थोर भक्ती आवडते देवा, संकल्पावी माया संसाराची.'' भक्ती करणे म्हणजे जी गोष्ट आपल्याला अत्यंत प्रिय असते, ती परमेश्वराला अर्पण करावी. संसार, मुलेबाळे या गोष्टी आपल्या अत्यंत प्रिय असतात. त्यांच्यावर आपले जीवापाड प्रेम असते. हेच प्रेम भगवंताला अर्पण करावे. आणि भगवंताचे प्रेम अंतर्यामी धारण करावे.


स्वसंवाद :


१. ज्या शिक्षण, नोकरी, संपत्ती किंवा नात्यांना मी माझ्या जीवनाचे सार्थक मानून बसलो आहे, ते खरंच चिरंतन सत्य आहे की केवळ एक तात्पुरता भ्रम (मृगजळ) आहे?


२. ''म्हातारपणी माझे कसे होईल? मुले मला सांभाळतील ना?'' अशा भविष्यातील भवाच्या (संसाराच्या) व्यर्थ चिंतांमध्ये मी माझा आजचा दिवस आणि मनाची शांतता गमावत आहे का?

३. माझ्या अंतर्मनात साचलेला बऱ्या-वाईट वासनांचा कचरा साफ करण्यासाठी मी पतितांना पावन करणाऱ्या राघवाच्या नामाचा आश्रय किती वेळा घेतो?

४. तुकाराम महाराजांनी सांगितल्याप्रमाणे, मी प्रपंचातील माझी सर्व आसक्ती आणि प्रेम भगवंताच्या चरणी अर्पण करून निर्वासन भक्तीचा अनुभव घ्यायला तयार आहे का? **(क्रमशः)**







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नामाचे सूक्ष्म स्वरूप

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु:खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***





समाज ऋण किंवा योगदान देणे

मित्रांनो आणि वाचकहो आपण जन्माला येतो,नंतर आईवडील, घर व आपले नातलग बहिणभाऊ यातून पुढे मोठे होत जातो, पुढे तारूण्य येऊन आपण देश समाज जगाशी जोडल्या जातो.नंतर कालांतराने तनमनधनाने सर्व कार्ये करतो.तसेही तारूण्य-प्रौढत्व आणि वृद्ध त्व या अवस्था मधून आपण वाटचाल करतो. पण मित्रांनो, ईथे मला एक गोष्ट सांगावी वाटते. या तिन्ही अवस्थेत आपण समाजरूण सामाजिक योगदानाचा भान ठेवून आपला खारीचा वाटा उचलावा.सामाजिक योगदान किंवा कार्य करण्यासाठी, किंवा त्याग करण्यासाठी अनेक क्षेत्रात आपण जमेल तसे काम करू शकतो. त्यासाठी अनेक क्षेत्रे,प्रकार आहे, अगदी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण रक्षण, झाडे लावणं, वाढविणे, पाणी प्लास्टीकचा योग्य व साधकबाधक वापर; महिल बालक, अपंग, अधू, दिव्याग यांचे सशक्तीकरण करणे; गरीबगरजूना अन्न वस्त्र निवारा, पैसा इ. देऊन मदत करणे; अनाथ, वृध्याश्रमातील आबालवृद्ध यांना मदत अशाप्रकारे आपण हे ऋण फेडून योगदान देऊ शकतो अगदी लहान कामे करून मोठा बदल समाजात घडतो. हे अनेक समाजसेवकानी दाखवून दिले यालाच सामाजिक बांधिलकी म्हणतात, यातच मित्रांनो आनंद समाधान मिळते! अगदी संत तुकाराम पासून संतांनी. हि समाजसेवा मानली. "आम्हा घरी शब्द हेची धन, शब्दाची रत्ने" किंवा रस्ते झाडणारे गाडगेबाबा व ईतर संत हे सामाजिक योगदानाचेच प्रतिक होय.आज एवढे समाजकार्य पुरे करतो व थांबतो. आपण वाचत राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे.. शुभ सकाळ शुभ दिवस आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



गुणकारी आलं (अद्रक)

ज्योतिर्मय साहित्य

आल्याचा वापर करून शरीरातील युरीक ॲसिड करू शकता कमी, जाणून घ्या सेवनाची पद्धत

आजकाल शरीरात यूरिक ॲसिड वाढणं ही एक कॉमन समस्या झाली आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाईल यामुळे अनेकांना ही समस्या होते. जेव्हा शरीरात यूरिक ॲसिड वाढतं तेव्हा सांधे, जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज अशा समस्या होतात. जर वेळीच यावर उपचार केले नाही तर ही समस्या आणखी वाढू शकते. यूरिक ॲसिड कंट्रोल करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायही करू शकता. जवळपास सगळ्याच किचनमध्ये मिळणारी एक गोष्टी ही समस्या दूर करू शकते. ही गोष्ट म्हणजे आलं.

यूरिक ॲसिड कमी करतं आलं

आल्याच्या चहापासून ते वेगवेगळ्या पदार्थांमध्ये समावेश केला जातो. याने पदार्थांची टेस्ट तर वाढतेच सोबच यात अनेक औषधी गुणही असतात. यातील अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडेंट ने शरीरातील सूज कमी होते. तसेच आल्याने पचनक्रियाही चांगली होते. शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघण्यास मदत मिळते.

आलं कसं करतं काम?

आल्यामध्ये जिंजरोल्स नावाचं एक शक्तीशाली तत्व असतं, जे शरीरात यूरिक ॲसिड जमा होण्यापासून रोखतं. हे तत्व यूरिक ॲसिडचे क्रिस्टल बनण्याची प्रक्रिया हळूवार करतं. ज्यामुळे जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज कमी होते. तसेच याच्या मदतीने शरीरात रक्तप्रवाह सुद्धा सुरळीत होतो. इतकंच नाही तर शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघतात.

आल्याचं सेवन करण्याची योग्य पद्धत

आल्याचं सेवन वेगवेगळ्या प्रकारे

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

तुम्ही करू शकता. मात्र, याचा योग्य पद्धतीने वापर करणं गरजेचं आहे. तेच जाणून घेऊया...

आल्याचा चहा

आल्याचा चहा यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी एक बेस्ट उपाय आहे. यासाठी ताज्या आल्याचे छोटे-छोटे तुकडे करा आणि ते पाण्यात उकडून घ्या. तुम्हाला हवं तर तुम्ही यात थोडं मध आणि लिंबाचा रसही टाकू शकता. याच चहाचं दिवसातून दोन वेळा सेवन करा.

आलं आणि हळदीचं मिश्रण

आलं आणि हळद दोन्हींमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी गुण भरपूर असतात. या दोन्हींचं मिश्रण करून एक पेस्ट बवा आणि ही पेस्ट कोमट पाण्यात टाकून सेवन करा. याने यूरिक ॲसिड कमी करण्यास मदत मिळते.

आल्याचा रस

ताज्या आल्याचा थोडा रस काढून त्यात थोडा लिंबाचा रस टाका. हा रस सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा. याने शरीर आतून डिटॉक्स होईल आणि यूरिक ॲसिडही कंट्रोल होईल.

आल्याचं तेल

आल्याचा तेलाचा सुद्धा तुम्हाला जॉईंट्समधील सूज आणि वेदना कमी करण्यास करू शकता. या तेलाने जॉईंट्सवर हलक्या हाताने मालिश करा. याने ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि वेदनाही कमी होतात.

काय काळजी घ्या?

आल्याचं जास्त सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. त्यामुळे याचं सेवन कमी प्रमाणात करा.

जर तुम्हाला आरोग्यासंबंधी एखादी गंभीर समस्या असेल तर आल्याचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

****



हरी नामाची गोडी

आस तुझ्या दर्शनाची
मुखी आहे फक्त
हरी नामाची गोडी
मनी वसे माझ्या
विठूरायाची मुर्ती अन्
सोबतीला श्रध्देची जोडी

हरी नामाची गोडी
लाभावी सदा सर्वदा
दुजे नको काही
भजन,किर्तनी रमे
मन अन् नयन
विठूरायास नित पाही

अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त काव्य मैफल.. कवींनी केला अभिजात मराठीचा गौरव..



ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – टेरेसवरील कविता परिवार, ध्यास गझल समूह ह्यांच्या अभिजात मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने ३ ऑक्टोबर शनिवार रोजी घेतलेली मराठी कवितांची बहारदार मैफल हडको भागात चांगलीच रंगली.

श्री संजय पवार यांच्या निवासस्थानी कवींनी कवितेच्या माध्यमातून माय मराठीचा गौरव केला.

यावेळी प्रा.विजय पोहनेरकर, प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी, नारायण पांडव, संजय विटेकर, डॉ राज रणधीर, अश्विनी विटेकर, लता गवळी या मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून मैफलीची मंगलमय सुरुवात केली.

या मैफलीत कवी सुनील उबाळे, अशोक खेडकर,

वरद खळीकर, मनोरमा बोराडे, योगेश अक्कर, कैलास कोळपकर, प्रगती साहुजी, प्रशांत नानकर, रुपाली पाटील इत्यादी कवींनी बहारदार कविता, गझला सादर केल्या.

गझलकार गिरीश जोशी ह्यांनी
भाव खातो केवढा गजऱ्यात असतो
पण, सकाळी मोगरा कचऱ्यात असतो.

आठवण येताच मी परिधान करतो
गंध बापाचा जुन्या सदऱ्यात असतो
ही गझल सादर केली.

गझलकारा अश्विनी विटेकर ह्यांनी
स्वप्न सुखाचे पाहत जगल्या काही बाया
दुःखामध्ये हासत जगल्या काही बाया
जात्यावरती दळता दळता सुचल्या ओव्या
रोज नव्याने भरडत जगल्या काही बाया
या शेरांतून स्त्रियांचे दुःख मांडले.

संजय पवार ह्यांनी,
घड्याळात लावू सखे, गजर कोणते
तुला साद घालू असे, प्रहर कोणते
हृदय मंदिरी मी तुला,असे कोंदले
मिळेना कुठेही असे,मखर कोणते
अशी हळवी गझल सादर केली.

बाल कवयित्री काम्या कोळपकर हिने फुलपाखरावरची सुंदर कविता सादर करून सर्वांची वाहवा मिळवली..

युवा गझलकार अजय त्रिभुवन याने
दिला नाहीस दुसरा एकही पर्याय आम्हाला
धरावे लागले मग गाढवाचे पाय आम्हाला
असा शेर सादर केला.

अर्जुन गायकवाड ह्याने
उद्याला बुडवल्या जातील गाथा आमुच्याही
तुक्याच्या पाउलावर टाकले पाऊल आम्ही
ह्या शेरातून लेखकांची बाजू मांडली..

संगीता चव्हाण ह्यांनी शब्दांच्या प्रांगणात अक्षरांचीच फुले.. पहा कौतुके डोलती..

ही कविता सदर केली.

शितल सराफ ह्यांनी ,
पहिल्या किरणापासून लखख मध्यान्हीच्या उन्हात
मावळतीच्या संधी प्रकाशात अविरत सोबत असत ती गर्दी!! ही कविता सादर केली

कवी प्रा.विजय पोहनेरकर
समजंवावं कुठवरी
काही उमगत नाही
काय झालं कुणा ठावं
पाऊस येत नाही

अशी पावसाच्या वागण्याची विपरीत रीत कवितेतून चित्रित केली.

लता गवळी ह्यांनी जेन झी तरुणाईला उद्देशून कविता सादर केली..

ऋषभ कुलकर्णी याने
काय मागू तुझ्या मंदिरी ईश्वरा?
जन्मता तू मला एक आई दिली !
माणसा लाभली फक्त वाचा तुला
त्यात भाषा मुखी ही मराठी दिली .
अशी गझल सादर केली.

कवी अरविंद कुलकर्णी ह्यांनी
सिमेंटची ही जंगले
कठीणच जगायला
नजर टाकली सर्वत्र
दिसत नाही खायला
सुनीता कपाळे ह्यांनी
ऋण सावकारी मोठं
नाही हाताला कवडी
उभं साल सरलया
तुरं मारतोया दडी.. ही कविता सादर केली

अमेय तांदूळजे ह्याने
जन्म फुलाचा घातक होता फ ुलल्यानंतर कळले
दरवळलो मी व्यर्थ आजवर खुडल्यानंतर कळले
ही गझल सादर केली.

मनोरमा बोराडे ह्यांनी सादर केलेल्या शब्द बसले रेषेवरी अन ओळ झाली,
गोड माझी वेदना मोहोळ झाली
हिरवी तुळस बाहेर होती जन्मभर
वाळली अन् मग, गळ्याची माळ झाली.

ह्या ओळींनी रसिकांची विशेष दाद मिळविली.

युवा कवयित्री तन्वी न्यायाधीश हिने
शब्द बांधू शकतात, पूल दोन माणसांत
शब्द बांधू शकतात, भिंती कित्येक नात्यांत
शब्द देती कधी, मनी खोलवर जखमा
शब्दांची मोहिनी अशी, वाटे लागला चकवा
ही कविता सादर केली.

रेणुका जोशी ह्यांनी
या व्यथा वेदनांना मी सापडले नाही कारण
मी लपून बसले होते आईच्या पदराखाली
ही गझल सादर केली.

सुहास महाजन ह्यांनी वारसा ही कविता सादर केली.कवी नारायण पांडव ह्यांनी वृक्ष संवर्धन यावर कविता सादर केली.

तर विजय पांचाळ ह्यांनी
स्वातंत्र्य दिनाच्या पहाटे
शांत वातावरण असतांनाही
कचराकुंडीच मन उद्विग्न झाल,
एक तान्हुल अर्भक
उच्चशिक्षित माणसांने
कचराकुंडीत होत फेकून दिलं.
अशी वास्तववादी कविता सादर केली.

सदरील मैफलीत शहरातले आणि बाहेर गावचे अनेक कवी सहभागी झाले. मैफल उत्तरोत्तर रंगत गेली.विजय पोहनेरकर ह्यांच्या कवितेने मैफलीची सांगता झाली. सुहास महाजन आणि गिरीश जोशी ह्यांनी निवेदनाची धुरा सांभाळली.



आधुनिक तंत्रज्ञानात मराठीचा वापर वाढवा-कवी डॉ. हबीब भंडारे

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – मराठी ही आपल्या विचारांचा, भावनांचा आणि सांस्कृतिक अस्मितेचा आधार आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने आपली जबाबदारी अधिक वाढली असून दैनंदिन व्यवहार, शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानात मराठीचा अधिकाधिक वापर करावा, असे प्रतिपादन कवी डॉ. हबीब भंडारे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय व भाषा संचालनालय, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 'मराठी भाषा सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात डॉ. भंडारे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्धन विधाते, उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) सविता चौधर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) रुपेश शिंगारे, विभागीय संचालक बाबासाहेब जगताप यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

डॉ. भंडारे म्हणाले की, ताम्रपट, शिलालेख आणि 'गाथासप्तशती'पासून मराठी भाषेची प्राचीन व समृद्ध परंपरा दिसून येते. यादव काळात मराठीचा राज्यव्यवहारात वापर झाला, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही मराठीला राज्यकारभारात महत्त्वाचे स्थान मिळाले. संत साहित्याने मराठीचा सांस्कृतिक आणि वैचारिक वारसा अधिक समृद्ध केला.


मातृभाषा ही भावनिक आणि वैचारिक विकासाचे प्रभावी माध्यम आहे. उच्च व तांत्रिक शिक्षणातही मराठीचा वापर वाढला पाहिजे. मराठीतील दर्जेदार साहित्य अन्य भाषांमध्ये अनुवादित व्हावे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि विविध डिजिटल माध्यमांमध्ये मराठीचा वापर वाढवावा. स्वतःची स्वाक्षरी मराठीत करण्यापासूनही याची सुरुवात करता येईल, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात विभागीय संचालक बाबासाहेब जगताप यांनी सांगितले की, ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे हा मराठीच्या हजारो वर्षांच्या साहित्यिक, सांस्कृतिक व भाषिक परंपरेचा गौरव आहे. यासाठी रंगनाथ पठारे, हरी नरके यांच्यासह अनेक संशोधक व साहित्यिकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. अभिजात दर्जानंतर मराठी भाषेचे संवर्धन, प्रसार आणि व्यवहारातील वापर वाढविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

औंढा नागनाथच्या पायी शिर्डी दिंडीत अवतरले वैजापूरचे प्रति साई


ज्योतिर्मय साहित्य


वैजापूर – औंढा नागनाथ येथील साई भक्त व शिव भक्तांची पायी दिंडी वैजापूरात वैष्णवी लौन येथे रविवार(ता.०४) रोजी येताच येथील शिर्डीचे ''प्रति साई बाबा'' म्हणून परिचित असलेले धोंडीरामसिंह राजपूत या दिंडीतिल साई भक्तांच्या आग्रहास्तव शिर्डीच्या श्री साईबाबांची वेषभूषा परिधान करून आरतीत सहभागी झाले.




औंढा नागनाथ येथील शिर्डी पायी दिंडीतील साई भक्त प्रति साईबाबा पाहून भारावले व दर्शनासाठी त्यांची रांग लागली.या प्रसंगी या दिंडीचे आयोजक संतोष बोथरा, प्रकाशशेठ बोथरा, सुधीर लालसरे, गिरीश भालेराव, श्री छाजेड, श्री संचेती, संतोष पवार, श्री. धुमाळ, श्री,शिंपी, काशिनाथ आगाज, श्रावण चौधरी,गणेश धुमाळ, महेश जाधव, विजय जोशी व कुलकर्णी यांनी दिंडी सेवकांची सेवा केली.











जनमानसाची नाडी ओळखणारे संघटक - गोविंदराव याळगी

ज्योतिर्मय साहित्य


(मागील अंकावरून)

गोविंदराव याळगी आणि हणमंतराव देशपांडे यांनी बेळगावात 'मॅझिनी क्लब'ची स्थापना केली. इटलीच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक नेते ज्युसेपे मॅझिनी यांच्या नावावरून या संस्थेचे नामकरण करण्यात आले होते. मॅझिनीने तरुणांना संघटित करून इटलीच्या राष्ट्रीय एकीकरणासाठी संघर्ष केला होता. त्यामुळे भारतीय तरुणांसाठीही त्याचे कार्य प्रेरणादायी मानले जात असे.मॅझिनी क्लबचा उद्देश तरुणांमध्ये शारीरिक ताकद, शिस्त, धैर्य, देशभक्ती आणि संघटनभावना निर्माण करणे हा होता. या क्लबमध्ये स्फोटकांच्या प्रयोगांची माहिती, बॉम्बनिर्मितीचे प्राथमिक प्रशिक्षण, पिस्तूल चालविण्याचे शिक्षण आणि मल्लखांबासारख्या व्यायामप्रकारांचे प्रशिक्षण दिले जात असे.त्या काळातील ब्रिटिशविरोधी चळवळ दोन प्रवाहांत विकसित होत होती. एक प्रवाह महात्मा गांधींच्या अहिंसक सत्याग्रहाचा होता, तर दुसरा प्रवाह गुप्त क्रांतिकारक संघटनांचा होता. गोविंदराव याळगींच्या कार्यात या दोन्ही प्रवाहांचा प्रभाव लोकमान्य टिळक यांच्यामुळे होता . ते टिळकांच्या राष्ट्रवादी परंपरेतील होते आणि तरुणांना धैर्य, शारीरिक क्षमता व प्रतिकाराची तयारी यांचे प्रशिक्षण देत होते.मॅझिनी क्लबच्या माध्यमातून तरुणांमध्ये आत्मविश्वास वाढला. ब्रिटिश अधिकारी, पोलिस आणि प्रशासन यांच्याविषयीची भीती कमी झाली. स्वराज्यासाठी त्याग, शिस्त आणि संकटांना सामोरे जाण्याची वृत्ती तयार झाली. पुढे बेळगाव व परिसरातील क्रांतिकारक कार्यात या वातावरणाचा उपयोग झाला.

गोविंदराव याळगी हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनांना नियमितपणे उपस्थित राहत असत. काँग्रेस त्या काळात भारतीय राजकीय असंतोषाचे प्रमुख व्यासपीठ बनत होती. सुरुवातीला काँग्रेसची मागणी घटनात्मक सुधारणा आणि प्रशासनात भारतीयांचा अधिक सहभाग यापुरती मर्यादित होती,परंतु पुढे स्वराज्याची मागणी तीव्र होत गेली.लोकमान्य टिळक यांच्या निधनानंतर गोविंदराव याळगी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यात टिळकांच्या कार्यपद्धतीला अनुसरून सहभागी झाले.

गोविंदरावांना बेळगावात काँग्रेसचे अधिवेशन भरवण्याची इच्छा होती. बेळगाव हे महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील महत्त्वाचे केंद्र असल्यामुळे तेथे काँग्रेसचे अधिवेशन भरल्यास दक्षिण भारतातील राष्ट्रीय चळवळीला मोठी चालना मिळेल, असे त्यांना वाटत होते. त्यांनी या दिशेने गंगाधरराव देशपांडे यांच्याबरोबर प्रयत्न केले.

१९२४ मध्ये बेळगाव येथे काँग्रेसचे ऐतिहासिक अधिवेशन



भरले. या अधिवेशनाचे अध्यक्षपद महात्मा गांधींनी भूषविले. तथापि, गोविंदराव याळगी यांचे निधन १९२३ मध्येच झाले होते. त्यामुळे आपल्या आयुष्यभराच्या स्वप्नाची प्रत्यक्ष पूर्तता पाहण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले.१९२४च्या अधिवेशनाच्या प्रारंभी महात्मा गांधींनी गोविंदरावांना श्रद्धांजली अर्पण केली.हा प्रसंग गोविंदरावांच्या योगदानाची राष्ट्रीय पातळीवरील दखल दर्शवितो. एखाद्या शहरात काँग्रेसचे अधिवेशन भरविणे हे केवळ संघटनात्मक काम नव्हते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी, निवास, भोजन, वाहतूक, सुरक्षा, प्रचार आणि स्वयंसेवकांची व्यवस्था आवश्यक होती. बेळगावातील राष्ट्रीय वातावरण निर्माण करण्यासाठी गोविंदरावांनी इतरांसह अनेक वर्षे केलेल्या प्रयत्नांचा तो परिणाम होता.

बेळगावच्या स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास गोविंदराव याळगी आणि गंगाधरराव देशपांडे यांचे स्मरण केल्याशिवाय पूर्ण होत नाही. गंगाधरराव देशपांडे हे लोकमान्य टिळकांचे अनुयायी आणि पुढे गांधीवादी चळवळीचे महत्त्वाचे नेते होते. त्यांना 'कर्नाटकाचा सिंह' म्हणून ओळखले जात असे. बेळगाव-कर्नाटक प्रदेशातील स्वातंत्र्यचळवळ उभी करण्यात त्यांचे मोठे योगदान होते.गोविंदराव आणि गंगाधरराव यांच्यात वैचारिक जवळीक होती. दोघेही टिळकभक्त होते आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध लोकांना संघटित करण्याचे काम करीत होते. एका बाजूला गोविंदराव सार्वजनिक उत्सव, तरुणांचे प्रशिक्षण आणि राजकीय सभा यांचे आयोजन करीत.तर दुसऱ्या बाजूला गंगाधरराव ग्रामीण भागात राष्ट्रीय चळवळीचा विस्तार करीत.या सहकार्यामुळे बेळगाव शहर आणि ग्रामीण परिसर यांच्यातील संबंध मजबूत झाले. शहरातील राजकीय विचार गावांपर्यंत पोहोचले आणि ग्रामीण कार्यकर्त्यांचा सहभाग शहरातील चळवळीला मिळाला. स्वदेशी, बहिष्कार, सत्याग्रह, राष्ट्रीय शिक्षण आणि ब्रिटिशविरोधी आंदोलन यांना यामुळे व्यापक आधार मिळाला.



गोविंदराव याळगी आणि गंगाधरराव देशपांडे यांनी एकत्रितपणे टिळकांच्या सभा आयोजित केल्या होत्या. एका प्रसंगी सभा घेण्यासाठी जागा स्वच्छ करून तयार करण्याचे कामही त्यांनी रातोरात केले, अशी परंपरा सांगितली जाते.गोविंदराव याळगींच्या कार्याचा सर्वांत मोठा परिणाम त्यांच्या कुटुंबावर झाला. त्यांच्या देशभक्तीने प्रेरित होऊन याळगी कुटुंबातील अनेक सदस्य स्वातंत्र्यचळवळीत सहभागी झाले. याळगी घर हे राजकीय कार्यकर्ते, समाजसुधारक, क्रांतिकारक आणि राष्ट्रीय नेत्यांच्या भेटीगाठींचे केंद्र बनले.

स्वातंत्र्यलढ्यात याळगी कुटुंबातील तेरा सदस्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९०५च्या बंगालच्या फाळणीविरोधी आंदोलनापासून १९४२च्या भारत छोडो आंदोलनापर्यंत या कुटुंबाचा महत्वाचा सहभाग राहिला. या काळात अटक, कारावास, आर्थिक नुकसान, सरकारी छळ आणि सामाजिक दबाव यांचा सामना कुटुंबाला करावा लागला.याळगी यांच्या घरात अनेक राष्ट्रीय नेत्यांचे आगमन होत असे. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, मोरारजी देसाई, सेनापती बापट, एस. एम. जोशी, एन. जी. गोरे, बाळासाहेब खेर आणि इतर नेते येथे आले होते.गंगाधरराव देशपांडे यांचे याळगी कुटुंबाशी निकटचे संबंध होते. याळगी घर हे केवळ एका कुटुंबाचे निवासस्थान नव्हते, तर स्वातंत्र्यचळवळीतील संपर्क, नियोजन आणि विचारविनिमयाचे केंद्र होते. ब्रिटिशांच्या देखरेखीखालीही अशा घरांमधून पत्रव्यवहार, बैठका, स्वयंसेवकांची जमवाजमव आणि आंदोलनांचे नियोजन केले जात असे.

गोविंदरावांच्या निधनानंतरही त्यांच्या कुटुंबातील राष्ट्रवादी परंपरा थांबली नाही. कृष्णराव याळगी, जीवनराव याळगी, रामाबाई याळगी, गजाननराव, विठ्ठलराव आणि इतर सदस्यांनी विविध टप्प्यांवर स्वातंत्र्यचळवळीत योगदान दिले. कृष्णराव याळगी हे गोविंदरावांचे सहकारी आणि बंधू होते. त्यांनी क्रांतिकारकांना आर्थिक मदत केली आणि अनेक कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. १९२४च्या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी प्रतिनिधींच्या पाण्याच्या गरजेसाठी 'काँग्रेस विहीर' किंवा 'पंपा सरोवर' बांधण्याची जबाबदारी त्यांनी घेतली.स्वातंत्र्यवीर गोविंदराव याळगींच्या कार्याचा विचार केला तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील काही वैशिष्ट्ये विशेष ठळकपणे दिसतात. सर्वप्रथम ते अत्यंत धाडसी होते. ब्रिटिशांच्या दडपशाहीची जाणीव असूनही त्यांनी सार्वजनिक आंदोलन, सभा आणि मिरवणुका आयोजित केल्या.

(क्रमशः)


कुसुमाग्रज आणि संगीत नाटक: मराठींची जगाला अमुल्य देणगी

ज्योतिर्मय साहित्य

मराठी साहित्य आणि रंगभूमीच्या इतिहासात कवि कुसुमाग्रज (विष्णू वामन शिरवाडकर, १९१२ १९९९) यांचे स्थान अत्यंत उच्च आहे. केवळ कवी म्हणूनच नव्हे, तर नाटककार, कादंबरीकार आणि रंगभूमीचे जाणते समीक्षक म्हणूनही त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मोलाचे योगदान दिले. १९७० साली कोल्हापूर येथे भरलेल्या ५१ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी एक ऐतिहासिक विधान केले. ते म्हणाले, ''संगीत नाटक याद्वारे मराठी माणसाने जगाला एक अमुल्य देणगी दिली आहे.'' हे वाक्य केवळ गौरवोक्ती नसून, मराठी रंगभूमीच्या समृद्ध वारशाची आणि जागतिक संस्कृतीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाची साक्ष देणारे आहे.

संगीत नाटक हा मराठी रंगभूमीचा अमूल्य वारसा आहे. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी १८८० मध्ये 'शाकुंतल' या पहिल्या संगीत नाटकाद्वारे या परंपरेला सुरुवात केली. त्यानंतर राम गणेश गडकरी, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल यांसारख्या दिग्गजांनी या प्रकाराला उंची दिली. संगीत नाटकातून मराठी भाषेची लय, काव्य आणि संगीताची साथ तसेच अभिनयाची ताकद एकत्रितपणे अनुभवता येते. केवळ मनोरंजनच नव्हे, तर सामाजिक सुधारणा, देशभक्ती आणि नैतिक मूल्यांचे संस्कारही या नाटकांतून जनमानसात रुजवले गेले.

कुसुमाग्रजांच्या मते, जगातील इतर भाषांमध्ये अशा प्रकारचा संगीतमय नाट्यप्रकार आढळत नाही किंवा तो मराठीइतका समृद्ध नाही. त्यामुळेच ही



''अमुल्य देणगी'' ठरते. संगीत नाटकांनी मराठी संस्कृतीची, भावविश्वाची आणि कलात्मक अभिव्यक्तीची उच्च पातळी जगाला दाखवून दिली. गद्यनाटकाच्या आधी मराठी रंगभूमीवर संगीत नाटकांनी जी समृद्धी निर्माण केली, ती जगातील कोणत्याही भाषेच्या रंगभूमीवर दुर्मिळ आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. कुसुमाग्रज स्वतः लहानपणापासूनच संगीत नाटकांच्या प्रभावाखाली वाढले. शाळेत असताना त्यांनी ललित कलादर्श, बलवंत संगीत मंडळी, महाराष्ट्र मंडळी यांच्या प्रयोगांचा आस्वाद घेतला होता. किर्लोस्करांचे 'कीचकवध' आणि गडकरींचे 'एकच प्याला' यांसारखी नाटके त्यांच्यावर खोल संस्कार करून गेली होती. याच संस्कारांतून त्यांनी स्वतःही अनेक गाजलेली नाटके लिहिली. 'नटसम्राट', 'विशाखा', 'कौंतेय', 'दुसरा पेशवा', 'वीज म्हणाली धरतीला' यांसारखी नाटके मराठी रंगभूमीवर अजरामर ठरली आहेत. विशेषतः 'नटसम्राट' हे नाटक तर मराठी रंगभूमीवरील एक अजरामर कलाकृती मानली जाते.

कुसुमाग्रजांचे हे विधान केवळ एक गौरवोक्ती नसून, मराठी संस्कृतीच्या जागतिक पातळीवरील योगदानाची जाणीव करून देणारी ऐतिहासिक साक्ष आहे. संगीत नाटकाद्वारे मराठी माणसाने जगाला दिलेली ही ''अमुल्य देणगी'' आजही मराठी रंगभूमीच्या ओळखीचा अविभाज्य भाग आहे. भाषा, संगीत आणि अभिनयाचा अद्वितीय संगम, सामाजिक संस्कार आणि जागतिक दर्जाची कलाकृती या तिन्ही गुणांमुळे संगीत नाटक हा मराठी रंगभूमीचा अमूल्य वारसा ठरतो. कुसुमाग्रजांच्या शब्दांतून ही देणगी जगाला ओळखली गेली आणि मराठी संस्कृतीच्या अभिमानाचा एक नवा अध्याय लिहिला गेला.



'वा. रा. कांत हे विलक्षण प्रतिभाशाली कवी'

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – वा. रा. कांत हे विलक्षण प्रतिभाशाली कवी होते. याचा प्रत्यय त्यांच्या काव्यातून सातत्याने येत राहतो, असे प्रतिपादन प्रा. डॉ. अरुणा चौधरी यांनी केले.

जीवन विकास ग्रंथालयाच्या 'वाचक व्यासपीठ' या उपक्रमाची आठवी साप्ताहिक बैठक सोमवार, दिनांक ५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता संपन्न झाली. मराठवाड्यातील कविवर्य वा. रा. कांत यांच्या जन्मदिनाच्या पूर्वसंध्येला त्यांच्या साहित्यावर संशोधन प्रबंध लिहिलेल्या डॉ. चौधरी यांचे व्याख्यान झाले.

निजाम राजवटीत प्रतिकूल परिस्थितीत कांतांचा पहिला काव्यसंग्रह 'पहाट-तारा' प्रकाशित झाला. सहा दशकांच्या साहित्यसेवेत कांतांनी नाट्यकाव्य आणि द्विदलार्थी कविता 'दोनूली' हा काव्यप्रकार मराठी साहित्यात आणला. त्यांनी आकाशवाणीच्या विविध केंद्रांवर विभागप्रमुख म्हणून काम पाहिले.


त्यांचे काव्य आजही रसिकांच्या मनामनात रुंजी घालते. सांगीतिकेपेक्षा भिन्न, गाण्याचे अंग नसलेला, व्यक्तिचित्रण आणि संवादशैली यांच्या एकत्रीकरणातून जीवनविषयक दृष्टिकोन साकारणारा 'नाट्यकाव्य' नामक एक नवा, वेगळा प्रकार मराठी साहित्यात रुजवण्याचे श्रेय कांत यांना जाते. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील कामगिरीची दखल घेतली गेली नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यकारिणी सदस्य सौ. संगिता मंडलिक यांनी डॉ. अरुणा चौधरी यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती देत त्यांचा परिचय करून दिला.

प्राचार्य जीवन देसाई यांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

येत्या सोमवारी, म्हणजे दिनांक १२ ऑक्टोबर रोजी, शुभम वाचक मंच यांच्यातर्फे 'आठवणीतील पु. ल. देशपांडे' हे सादरीकरण केले जाणार असल्याचे सांगून जास्तीत जास्त सदस्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले.



अस्वस्थ बळीराजाची आर्त हाक

ज्योतिर्मय साहित्य

'जगाचा पोशिंदा' म्हणून मिरवणारा भारतीय शेतकरी आज अत्यंत अस्वस्थ आहे. ज्याच्या घामातून संपूर्ण देशाची भूक भागते, तो बळीराजा आज स्वतःच्याच अस्तित्वाची आणि आत्मसन्मानाची लढाई लढत आहे. मशागतीपासून ते थेट पीक बाजारात जाईपर्यंतचा त्याचा प्रवास एवढ्या अनिश्चिततेने भरलेला आहे की, शेवटी हतबल होऊन तो आत्महत्येसारखे अत्यंत दुर्दैवी पाऊल उचलत आहे. आजही वर्तमानपत्र उघडले तर निरनिराळ्या भागात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे वृत्त वाचायला मिळते. उन्हातान्हात जमीन तयार करून, चांगल्या बियाण्यांची आणि योग्य किमतीत खतांची वाट पाहण्यापासून शेतकऱ्याचा संघर्ष सुरू होतो. परंतु, बाजारात पाऊल ठेवताच खते आणि बियाण्यांमधील भ्रष्टाचार, काळाबाजार आणि बनावट मालाची फसवणूक त्याला सुरुवातीलाच आर्थिक फटका देते. त्यात भर म्हणून वेळेवर पाऊस पडणे आणि निसर्गाची कृपा राहणे या संपूर्णपणे नशिबाच्या गोष्टी बनल्या आहेत. गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे निसर्गाचे चक्र पूर्णपणे कोलमडले आहे. कधी ओला



दुष्काळ, तर कधी कोरडा दुष्काळ अशा निसर्गाच्या अवकृपेमुळे हाता-तोंडाशी



आलेला घास एका रात्रीत हिरावून घेतला जातो, ज्यामुळे लागवडीचा खर्चही निघत नाही.

शेतीसाठी भांडवल उभे करताना शासकीय बँकांचे उंबरठे झिजवणे हा शेतकऱ्याच्या आयुष्यातील दुसरा मोठा मनस्ताप आहे. बँक कर्ज वेळेवर मिळणे ही एक अत्यंत क्लिष्ट आणि दिरंगाईची प्रक्रिया झाली आहे. कागदपत्रांची पूर्तता करता करता पिकाचा हंगाम निघून जातो, ज्यामुळे लहान शेतकऱ्यांना नाईलाजाने गावातील खाजगी सावकारांच्या दारात जावे लागते आणि

सावकारांचे प्रचंड व्याजदर त्याला कर्जबाजारीपणाच्या खाईत लोटतात. या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी सरकारकडून कर्जमाफीच्या घोषणा केल्या जातात खरे, पण प्रत्यक्षात ती रक्कम मिळायला प्रशासकीय पातळीवर प्रचंड दिरंगाई होते. यात सर्वात मोठा अन्याय नियमित कर्जफेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांवर होतो. त्यांच्यासाठी प्रोत्साहनपर रक्कम जाहीर तर केली जाते, पण ती वेळेवर कधीच मिळत नाही. यामुळे शेतकऱ्यांमध्ये ''नियमित कर्ज भरून काय फायदा?'' अशी भावना निर्माण होते आणि प्रामाणिकपणे कर्ज भरणाऱ्यांमध्ये कर्ज थकवण्याची वृत्ती बळावते.

या अशा बिकट परिस्थितीत पिकांचे नुकसान झाल्यावर शेतकऱ्याला आधार देण्यासाठी पीक विमा नावाची व्यवस्था उभी केली गेली आहे. परंतु, आज ही व्यवस्थाच शेतकऱ्याच्या अस्वस्थतेचे एक मोठे कारण बनली आहे. पिकांचे अतोनात नुकसान झाल्यावरही विमा कंपन्यांकडून वेळेवर आणि योग्य नुकसानभरपाई मिळत नाही.

(क्रमशः)

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559